# CLUB 55 ची दिवाळी




२४ ऑक्टोबरला, ‘मस्ती’ रेस्टॉरंटमधे, CLUB 55 ची दिवाळी साजरी झाली. १२ ते ४ असा कार्यक्रम आखला होता. आल्या आल्याच सर्वांनी चकली, लाडू, शेव, चिवडयावर हलला केला व त्यानंतर मस्तपैकी भोजनाचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या सुरवातीस सौ. मोना वासुदेव व सौ. मीना देशपांडेनी आलेल्या मित्रमैत्रीणींच स्वागत केलं. नंतर सौ. मीना देशपांडेनी ह्या वर्षी CLUB 55 सुरू करून पाच वर्ष झाल्याची नोद केली. गेल्या पाच वर्षात पन्नाशीचे सगळे पच्चावन् झाले आणी आता कार्यक्रमाला उपस्थितीतांची संख्या वाढू लागली.










मीनाच्या स्वागतानंतर जगदीश वासुदेव हयांनी BMM convention विषयी थोडक्यात माहीती दिली तसेच लवकरच होणाऱ्या DIABETES Conference ला हजर राहण्याचे सर्वांना आवाहनही केले. (एव्हाना ताटातले सर्व लाडू फस्त झाले होते !! ☺ )

महाराष्ट्र फाँडेशन च्या Vice President शैला विदवांस यांनी १३ नोव्हेंबरला आयोजित केलेल्या कार्यक्रमाला येऊन निधि–संकलनास हातभार लावण्याची विनंती केली.

पुण्याच्या NRIPA (Non Resident Indian parents association) ह्या संस्थेत कार्यरत असणारे श्री. नातू हया कार्यक्रमाला हजर होते व त्यांनी त्या संस्थेच्या कार्याविषयी थोडीशी माहीती दिली. तसेच डॉ. विजय जोशी यांनी त्यांच्या विचारवेध विषयांवर MVCC मधे होणाऱ्या आगामी कार्यक्रमाविषयी सर्वांना सांगीतले.






 

CLUB 55 च्या दिवाळीसाठी खास कार्यक्रम आखला होता, सुहास पै ह्यांनी. त्याच शीर्षक होत – 'गाणे ओळखा पाहू' (Name that tune). Club 55 च्या मंडळीनी तरूणपणात गायली–गुणगुणलेली अशी गाणी सुहासने निवडली होती. गाण्याच्या सुरवाती च्या अर्ध्या ओळीवरून प्रथम गाण व त्यानंतर चित्रपट, गायक, संगीतकार हे ओळखायच व त्याची नोंद करायची  असा हा खेळ. आठ–आठ जणांचे ग्रुपस् केले होते व खेळ संपल्यावर  'चकली' हा ग्रुप विजेता ठरला. विजेत्यांची नावे  –मोहन व अलकनंदा भुजले, शैला व अशोक विदवांस, शकुन व रामानंद पानसे व प्रकाश लोथे. जिंकण्याच 80% श्रेय प्रकाश लोथे हयांना, आम्ही बाकी सारेजण उरलेल्या 20 टक्यात !! Hats off to Prakash Lothe.

 

 

 

ह्या कार्यक्रमानंतर पंडीता डॉ. सुजाता नातु ह्यांनी कथक हया नृत्यप्रकाराचे प्रात्यक्षित अभिनयामार्गे करून दाखवले. सुजाताताईंनी वयाच्या ६५ वर्षी कथकमधे डॉक्टरेट पदवी मिळवली असून, त्या अजूनही पुण्यात कथक शिकवतात.

ह्या नंतर कार्यक्रमाची सांगता झाली. तर मंडळी अश्या हया सुटसुटीत कार्यक्रमाच्या आयोजकांना व एक करमणूकप्रधान व Nostalgic खेळ खेळण्याची संधी आम्हां सर्वांना दिल्याबददल सुहास पैं ना धन्यवाद. तसेच 'मस्ती' च्या देसाई दांपत्याचे सुग्रास भोजनाची सोय केल्याबददल आभार.

सौ. शकुन् पानसे
१०:२७:१०